# सर्वज्ञ शक्ती

## आनंदमय जन्मदिवसाप्रीत्यर्थ प्रस्तुत
## श्रीगुरुमाईंसमवेत घडलेले काही प्रसंग

### श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : १

*वाणी अग्रवाल*

वर्ष २००१मध्ये मी, माझे पती गणेश यांच्याबरोबर बॉस्टनमध्ये राहात होते. आम्हाला बाळ व्हावे यासाठी आम्ही सहा वर्षांपासून प्रयत्न करत होतो. आम्ही अनेक निरनिराळे उपचार करून पाहिले, परंतु सर्व व्यर्थ ठरले. तो आमच्यासाठी खूपच निराशाजनक आणि थकवणारा काळ होता. शेवटी आम्ही सर्व प्रयत्न थांबवण्याचा निर्णय घेतला. आम्ही विचार केला, "जर बाळ झाले, तर खूपच छान, नाहीच झाले तरीदेखील ठीक आहे." अर्थात, आम्ही शरणागती पत्करली.

सर्व प्रकारची औषधे बंद केल्यानंतर तीन किंवा चार महिन्यांनी मला एक स्वप्न पडले. मी पाहिले की, मी श्री मुक्तानंद आश्रमाच्या अनुग्रह भवनातील खालच्या लॉबीत उभी आहे. आणि वरच्या लॉबीतून गुरुमाई माझ्याच दिशेने येत आहेत. येऊन त्या माझ्यासमोर थांबतात आणि माझ्याकडे खोलवर पाहतात. मग त्या माझ्या पोटावरून त्यांचा हात फिरवतात आणि म्हणतात, "मी हे देवाकडून घेऊन तुला देते आहे."

मी जेव्हा जागी झाले तेव्हा गुरुमाईंचे शब्द माझ्या कानात घुमत होते. ते स्वप्न इतके वास्तविक होते की, डोळे उघडल्यानंतरदेखील त्यातील एकेक गोष्ट मला स्पष्टपणे आठवत होती.

आणि, अर्थातच त्यानंतर लवकरच मी गर्भवती झाले, माझी मुलगी अर्पिता हिच्या वेळी मला दिवस गेले. डॉक्टरांकडून या गोष्टीची खात्री झाल्यानंतर गणेश आणि मी श्री मुक्तानंद आश्रमात सेवा अर्पित करण्यासाठी गेलो. ही गोड बातमी गुरुमाईंना सांगण्याची संधी मिळेल अशी आम्हाला आशा होती. तोपर्यंत ही गोष्ट आम्ही कोणालाही सांगितली नव्हती.

आश्रमात पोहोचल्यानंतर आम्ही अनुग्रह भवनाच्या खालच्या लॉबीमध्ये प्रवेश करत असतानाच तिथे आम्हाला गुरुमाई दिसल्या. जसे मी स्वप्नात पाहिले होते अगदी तशाच प्रकारे गुरुमाई वरच्या लॉबीतून

आमच्या दिशेने येत होत्या. गुरुमाई थेट माझ्यासमोर येऊन उभ्या राहिल्या आणि मी काही बोलण्याआधीच माझ्या पोटावरून हात फिरवत त्या म्हणाल्या, “आत काही आहे का?”

मी जेव्हा स्वीकृतीदर्शक मान हलवली तेव्हा गुरुमाई हसू लागल्या आणि त्या पुढे चालू लागल्या.

त्यानंतर, काही आठवड्यांनी मी पुन्हा आश्रमात गेले होते. आश्रमातील त्या वास्तव्यादरम्यानही मला गुरुमाईंच्या दर्शनाचे सौभाग्य लाभले.

दर्शनाच्या वेळी गुरुमाई माझ्याशी माझ्या गर्भावस्थेविषयी बोलल्या; आणि मग आमच्यातील संभाषण इतर विषयांकडे वळले. दर्शन समाप्त झाल्यावर, जाताजाता गुरुमाई माझ्याकडे वळल्या आणि म्हणाल्या, “तुम रोज़ श्रीगुरुगीता और श्रीरुद्रम् का पाठ करना, बच्चे को उनसे लाभ मिलेगा।” म्हणजेच, “तू रोज श्रीगुरुगीता आणि श्रीरुद्रम्‌चे पठण करत जा, त्यामुळे बाळाला लाभ होईल.”

हे मार्गदर्शन प्राप्त झाल्यामुळे मी अतिशय आनंदी आणि कृतज्ञ होते.

त्या दिवसापासून संपूर्ण गर्भावस्थेच्या दरम्यान मी दररोज श्रीगुरुगीता आणि श्रीरुद्रम् यांचे पठण केले.

प्रसूतीची वेळ जवळ आली तेव्हा मला थोडे अस्वस्थ वाटू लागले. माझ्या पतींनी मला हॉस्पिटलमध्ये नेले. ती २ जूनची संध्याकाळ होती. माझ्या डॉक्टरांनी माझी तपासणी केली आणि सांगितले की, मला इन्फेक्शन झाले आहे आणि तापदेखील आहे. त्यांनी मला अँटीबायोटिकचे इंजेक्शन दिले आणि अर्पिताच्या हृदयाच्या ठोक्यांवर लक्ष ठेवण्यासाठी मला एक मशीन जोडले. अर्पिताच्या हृदयाचे ठोके अतिशय जलद पडत होते. डॉक्टर अत्यंत चिंतित होत्या कारण त्याचा अर्थ होता की, बाळ संकटात आहे.

डॉक्टरांनी सांगितले की, कदाचित अँटीबायोटिक्सचा परिणाम सुरू झाल्यावर बाळालासुद्धा आराम पडेल.

परंतु काही तास उलटून गेल्यानंतरही अर्पिताच्या हृदयाचे ठोके अतिशय जलद गतीने पडणे कायम होते. ते पाहून डॉक्टरांनी सीझेअरिअन् करण्याचा निर्णय घेतला कारण बाळाच्या जीवाला धोका होऊ शकला असता.

डॉक्टरांनी सांगितले की, ते वीस मिनीटांत मला ऑपरेशनसाठी तयार करतील. माझे पती व मी, दोघेही चिंताग्रस्त होतो. डॉक्टर जेव्हा ऑपरेशनची तयारी करत होते तेव्हा वाट पाहताना आम्ही

श्रीगुरुगीता आणि श्रीरुद्रम्, दोन्ही सी.डी. एकाच वेळी चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. मंत्र सुरू होताच, अर्पिताच्या हृदयाच्या ठोक्यांची गती कमी होऊ लागली. आणि आम्ही आश्चर्यचकित तेव्हा झालो जेव्हा वीस मिनिटांच्या आतच तिच्या हृदयाच्या ठोक्यांची गती सामान्य झाली. आणि हे पाहून सर्व डॉक्टरदेखील आश्चर्यचकित झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी नैसर्गिक प्रसूतिप्रक्रियेद्वारे मी अर्पिताला जन्म दिला.

गुरुमाईंनी गणेशला व मला परमेश्वराचा हा अनमोल उपहार दिला होता. आणि गुरुमाईंनी मला एक आदेश दिला ज्याचे मला पालन करायचे होते, जेणेकरून हा उपहार आमच्या जीवनात यावा. आणि तसेच घडले.

गुरुमाई, आपले खूप-खूप आभार. मी अगदी मनापासून आपली कृतज्ञ आहे.

***

## श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : २

*क्षमा फॅरार*

वर्ष १९९१च्या वसंत ऋतूमध्ये गुरुमाई ऑस्ट्रेलियात ‘टीचिंग व्हिजिट्स्’च्या यात्रेवर होत्या. त्यावेळी मी श्रीगुरुमाईंच्या यात्रेसाठी श्री मुक्तानंद आश्रमातून एका लेखिकेच्या आणि संपादिकेच्या स्वरूपात सेवा अर्पित करत होते. एके दिवशी एका सेवाकर्तीने ऑस्ट्रेलियातून मला फोन केला आणि एक सेवाकार्य सांगितले, जे मी लवकरात लवकर पूर्ण करून पाठवावे असे अपेक्षित होते. मी लगेचच आपले लक्ष त्या सेवाकार्याकडे वळवले आणि ते पूर्ण होताच ऑस्ट्रेलियाला पाठवून दिले. त्यानंतर काही वेळाने मी भगवान नित्यानंद मंदिरात ध्यानासाठी गेले.

मी मंदिरात बडे बाबांबरोबर एकटी बसले होते; तेव्हा अचानक मला एक दृष्टान्त झाला ज्यात मी माझ्या सुषुम्नेचा स्तंभ पाहू शकत होते. मी अनुभवत होते की, कुंडलिनी शक्तीचा तेजोमय प्रकाश मध्यनाडीत एका नवीन स्तरापर्यंत वर गेला आहे आणि माझ्या हृदयक्षेत्राच्या ठीक वरपर्यंत पोहोचला आहे. मला जाणवले की, कालपरत्वे तो प्रकाश या स्थानाच्या वर जात राहील. या दृष्टान्तासह मला दरवाजाची कडी उघडण्याच्या आवाजासारखा एक आश्चर्यजनक आंतरिक आवाजही ऐकू आला.

हा प्रकाश पाहून, हा ध्वनी ऐकून असे वाटले की, जणू काही एखाद्याने हिसका देऊन मला गाढ झोपेतून पटकन जागे केले आहे. मला आठवते, त्या वेळी मी विचार केला होता : “आत्ताच मला एका स्वप्नातून जागे केले गेले आहे! एका *वाईट* स्वप्नातून!” आणि मग मी विचार केला : “मी माझ्या जीवनाच्या स्वप्नातून जागी झाले आहे.”

असे नाही की, त्या वेळी माझे जीवन खरोखरच *वाईट* होते—परंतु, त्या क्षणी मला बोध झाला की, माझ्या चेतनेला थोड्या अंधाराची सवय झाली होती. त्या वेळी मी अशा अनेक नकारात्मकता आणि संशय बाळगून जगत होते की, ज्यांच्याविषयी मी आत्मनिरीक्षण केले नव्हते. पण आता मी पाहिले की, माझ्या चेतनेचा प्रकाश अशा स्थानी पोहोचला आहे जिथे अजून जास्त प्रकाश आहे, अजून जास्त सकारात्मकता आणि विश्वास आहे.

मी श्रीगुरुमाईंबद्दल असलेल्या कृतज्ञतेने पूरित झाले, यासाठी की, मला सिद्धयोग मार्गाची कृपा आणि या मार्गाच्या शिकवणी प्राप्त आहेत, त्याचबरोबर श्रीगुरुमाईंनी मला अंधारातून बाहेर पडून प्रकाशात येण्यासाठी मार्गदर्शन दिले आहे. मला जाणीव झाली की, तो माझ्या भाग्यातील एक महत्त्वाचा क्षण होता.

दुसऱ्या दिवशी अगदी सकाळी, मला ऑस्ट्रेलियाहून पुन्हा त्या सेवाकर्तीचा फोन आला. तिने सांगितले, “तुम्ही करून पाठवलेल्या सेवाकार्याने श्रीगुरुमाई खूप प्रसन्न झाल्या. आणि मी तुम्हाला हे सांगावे, असे त्यांनी मला सांगितले आहे :

“जेव्हा मी ते सेवाकार्य गुरुमाईंकडे घेऊन गेले तेव्हा त्यांनी मला त्याच वेळी फोन करून तुम्ही केलेल्या कार्याबद्दल तुम्हाला धन्यवाद द्यावेत असे सांगितले. परंतु, जेव्हा मी माझ्या ऑफिसमध्ये पोहोचले तेव्हा पाहिले की, आता तर श्री मुक्तानंद आश्रमात मध्यरात्र असेल, आणि मला तुमची झोपमोड करण्याची इच्छा नव्हती.

“त्या दिवशी, नंतर जेव्हा मी पुन्हा गुरुमाईंना भेटले तेव्हा सर्वप्रथम त्यांनी मला विचारले, ‘तू क्षमाला फोन करून सांगितलेस का?’

“मी म्हणाले, ‘अजून नाही गुरुमाई, कारण त्या वेळी तिकडे मध्यरात्र होती.’

“गुरुमाई म्हणाल्या, ‘पण माझी अशी इच्छा होती की, तू त्याच वेळी क्षमाला फोन करावास. तिने मोठ्या आनंदाने फोनला उत्तर दिले असते. कोणास ठाऊक, कदाचित त्या वेळी ती एखादे वाईट स्वप्न

पाहात असेल आणि श्रीगुरूंच्या फोनने तिला उठवले असते तर ती फार खूश झाली असती. मध्यरात्री माझ्याकडून संदेश मिळाल्याने तिला अतिशय आनंद झाला असता.'"

आजदेखील जेव्हा मी श्रीगुरूंशी असलेल्या ऐक्याच्या तो आनंददायी क्षण आठवते तेव्हा मी विस्मयचकित होऊन जाते. श्रीगुरुमाईंचे अंतःस्फुरण, त्यांचा संकल्प, त्यांची उत्तरे—ही परम चेतनेच्या स्पंदनांहून भिन्न नाहीत. त्या हजारो, लाखो प्रसंगांचे रहस्य कशा प्रकारे समजवावे की, ज्यांच्यातील ती गोष्ट जी केवळ मन आणि इंद्रियांद्वारे जाणता येणार नाही, ती गोष्ट गुरुमाई जाणतात आणि त्याचे उत्तर देतात!

आणि गुरुमाई, आपण म्हणता ते अगदी खरे आहे : आपला फोन आला तर मला *नेहमीच* आनंद होईल; कोणत्याही वेळी, कोणत्याही स्थानी.

***

## श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : ३

*बर्नाडेट मर्फी*

मी तुम्हाला जो प्रसंग सांगणार आहे तो वर्ष १९९५च्या फेब्रुवारीतील एके संध्याकाळी घडला होता. त्या दिवशी कडाक्याची थंडी होती. मला एस. वाय. डी. ए. फाउंडेशनमध्ये सेवा अर्पित करायला सुरुवात करून सात वर्षे होऊन गेली होती. मी श्री मुक्तानंद आश्रमातील माझ्या खोलीत होते. कलेकलेने वाढत जाणारा चंद्र आकाशात उदित झाला होता आणि बाहेर सोसाट्याने वाहणाऱ्या वाऱ्याची सरसर ऐकू येत होती.

माझ्या मनात एक विचार घोळत होता आणि त्याविषयी मला गुरुमाईंचे मार्गदर्शन हवे होते, पण मला योग्य शब्द सापडत नव्हते. मला नेहमीच जर्नल लिहिण्याची खूप आवड होती, म्हणून मी माझ्या पलंगाजवळ जमीनीवर बसले आणि माझ्या जर्नलमध्ये गुरुमाईंना एक पत्र लिहिले, ते जर्नल त्यांनी काही महिन्यांपूर्वी मला दिले होते.

पत्र लिहिताना अतिशय प्रबळतेने मला गुरुमाईंच्या उपस्थितीची जाणीव होऊ लागली. मला जाणवले की, कृपेची शक्ती मला स्पष्टतेच्या स्थितीमध्ये घेऊन जाते आहे. माझे विचार शांत होऊ लागले आणि

माझ्या लेखणीतून पत्रातील शेवटचे शब्द बाहेर पडत असताना, माझ्या हृदयात प्रशांतीची व समाधानाची भावना उदयास येऊ लागली.

लेखन पूर्ण होत आले असताना, मला गुरुमाईंशी असलेल्या माझ्या संबंधाची इतक्या गहनतेने व स्पष्टपणे अनुभूति होऊ लागली की, जणू काही त्या अगदी तिथेच, माझ्या खोलीतच आहेत. माझ्यात त्यांच्या दर्शनाची उत्कट अभिलाषा जागी झाली; फक्त त्यांचे आभार मानण्यासाठी.

एक विचार आला : *गुरुमाई कॉरिडॉरमधून या दिशेने येत आहेत. मला जाणवते आहे की, त्या येतच असतील!* मग माझे तर्कयुक्त मन मध्ये आले. *मंगळवारच्या रात्रीचे आठ वाजले आहेत. तू स्वप्न पाहाते आहेस. गुरुमाई यापूर्वी कधीही तुझ्या खोलीत आल्या नाहीत आणि आता, रात्रीच्या या वेळी त्यांनी इथे येण्याचे काही कारणच नाही.*

परंतु, गुरुमाईंच्या उपस्थिती इतकी प्रबळ होती की, मला दाराबाहेर डोकावून पाहायचेच होते. फक्त एकदा चटकन थोडेसे डोकावून पाहते : काय हरकत आहे? म्हणून मी दाराजवळ गेले आणि हळूच दार उघडले.

गुरुमाई माझ्या कॉरिडॉरमध्येच नाही, तर त्या अगदी माझ्या दारात उभ्या होत्या, आणि त्यांचा हात दार उघडण्यासाठी दाराच्या हँडलवरच होता.

अत्यंत आश्चर्याने आणि आनंदाने मी म्हटले, “शुभ संध्या, गुरुमाई!”

गुरुमाईंनी विचारले, “कसे समजले तुला? तुला जाणवले का की, मी इथे आहे?

मी म्हणाले, “होय गुरुमाई! “मला अत्यंत प्रबळतेने तुमची उपस्थिती जाणवत होती.”

गुरुमाई माझ्या खोलीत आल्या, माझ्या पुजेच्या शेजारी उभ्या राहून खिडकीतून बाहेर चंद्राकडे पाहू लागल्या. त्या म्हणाल्या, “इथे छान दिसते आहे, इथे छान वाटते आहे.”

मी गुरुमाईंचे आभार मानले आणि म्हणाले, “मी माझ्या जर्नलमध्ये आपल्यालाच पत्र लिहित होते आणि मला मनात ज्या प्रशांतीचा आणि स्पष्टतेचा अनुभव होतो आहे त्यासाठी मला आपले आभार मानायचे होते.”

गुरुमाईंच्या डोळ्यांत एक चमक आली, त्या म्हणाल्या, “फार छान!” आणि त्या तिथून जाण्यासाठी वळल्या. मला आठवते की, जेव्हा आम्ही एकमेकींना शुभरात्री म्हटले तेव्हा मला अगदी शांत, कृतज्ञ आणि स्तब्ध वाटत होते.

बावीस वर्षे उलटून गेली आहेत आणि आजदेखील मला त्या उपहाराची जाणीव होते आहे जो गुरुमाईंनी मला त्या संध्याकाळी दिला होता : हे ज्ञान आणि हा अनुभव की, श्रीगुरू आणि शिष्य हृदयस्थानी सदैव एक आहेत.

***

## श्रीगुरुमाईंसमवेतचा प्रसंग : ४

*स्वामी इंदिरानंद*

वर्ष १९८५मध्ये मी ओकलंड येथील सिद्धयोग आश्रमात गेले होते. मी तिथे पहिल्यांदाच गेले होते आणि सत्संगांमध्ये आणि कोर्सेस्‌मध्ये वक्ता म्हणून सेवा अर्पित करत होते.

ओकलंडमध्ये काही काळ राहिल्यानंतर, एके दिवशी मला गुरुमाईंच्या सान्निध्यात असावे असे उत्कटतेने वाटू लागले. गुरुमाई त्या वेळी न्यूयॉर्क शहरात होत्या जिथे सत्संगाचे आणि शक्तिपात ध्यान शिबीराचे आयोजन केले गेले होते. मला आठवते, मी विचार करत होते, “मी इथे आहे हे त्यांना माहित असेल का?” माझे मन खिन्नतेने भरून गेले. मला आठवते, मी अगदी अंतःकरणापासून गुरुमाईंना प्रार्थना करू लागले, “गुरुमाई, कृपया मला दाखवून द्या की, मी इथे आहे हे तुम्हाला माहित आहे. कृपया मला दाखवून द्या की, तुम्ही माझ्या सोबत आहात.”

मी प्रार्थना करताच मला आनंदी वाटू लागले. त्यानंतर मी माझ्या खोलीची सफाई करू लागले तेव्हाही अंतरीचा हा उल्हासाचा भाव टिकून होता. आणि मग, मी झाडत असतानाच फोनची रिंग वाजली. मी फोन उचलला तेव्हा स्वीचबोर्डवर असलेली सेवाकर्ती आनंदाने किंचाळत होती.

शेवटी, ती काय म्हणते आहे हे मी समजून घेऊ शकले. ते काहीसे असे होते, “गुरुमाई फोनवर आहेत आणि त्यांना तुमच्याशी बोलायचे आहे. मी त्यांचा फोन तुम्हाला जोडून देऊ का?

निःसंकोचपणे, मी लगेच उत्तरले, “हो, हो! जरूर!”

फोनमध्ये एक किट् असा आवाज झाला आणि मग एक गंभीर, मखमली, प्रेमळ आवाज असे म्हणताना ऐकू आला, “इंदिरानंद, कशा आहात तुम्ही?”

“मी छान आहे, गुरुमाई!” अगदी उंच स्वरात आणि उत्साहाने मी उत्तर दिले. मग मी जरा थबकले. माझ्या आवाजाला थोडे खाली आणले आणि म्हणाले, “छान आहे, गुरुमाई! मी खूप छान आहे! मी अगदी मजेत आहे!”

मग आम्ही इतर विषयांवर बोललो. गुरुमाईंनी ओकलंडच्या आश्रमाविषयी विचारपूस केली आणि त्यांनी न्यूयॉर्क शहरात होणाऱ्या सत्संगाविषयी सांगितले.

शेवटी, गुरुमाई म्हणाल्या की, त्यांना लवकरच फोन ठेवावा लागेल कारण त्या गाडीत होत्या आणि कार्यक्रमाच्या ज्या स्थानी ते सर्वजण जात होते, तिथे ते पोहोचतच होते.

आम्ही एकमेकींचा निरोप घेतला, आणि आमचे बोलणे संपत असतानाच गुरुमाई अतिशय खेळकर आवाजात म्हणाल्या, “तुम्ही मला वारंवार फोन का नाही करत?”

आणि मग मला फोन ठेवल्याचा किट् असा आवाज ऐकू आला.

संपूर्ण दुपारभर मी विचार करत राहिले की, गुरुमाईंनी मला “वारंवार फोन करायला” सांगण्याचा काय अर्थ होता. मला प्रश्न पडला होता कारण फोन मी नव्हे, गुरुमाईंनी केला होता.

आणि ही गोष्ट संध्याकाळी माझ्या लक्षात आली जेव्हा मी हा अनुभव सत्संगात सांगत होते आणि संपूर्ण हॉल एकाच वेळी आश्चर्यचकित झाला. तेव्हा मला खरोखर समजले की, गुरुमाईंच्या म्हणण्याचा काय अर्थ होता. आणि मला एक अनमोल शिकवण मिळाली जिच्यामुळे माझ्या संपूर्ण साधनेला प्रेरणा मिळाली आहे :

गुरुमाई सतत आपल्यासोबत आहेत. जेव्हा आपण अगदी मनापासून त्यांना हाक देतो, तेव्हा गुरुमाईंना ते माहित असते.

© २०१७ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.